महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६
चे कलम २० (४) अन्वये अधिसूचना...
महाराष्ट्र राज्यातील मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता
प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन
नियमावलीतील विनियम क्र.२२.५ (iv) (a) मध्ये
सुधारणा करणेबाबत...

# अधिसूचना

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
निर्णय क्रमांक : टिपीएस- १८१७/प्र.क्र.१८१/१७/नवि-१३,
दिनांक : ०५ /०९/२०१८

**निर्णय :** सोबतची शासकिय अधिसूचना महाराष्ट्र शासन साधारण राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे खाजगी सचिव. मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव,उद्योग , ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति:-**

१) सह सचिव तथा संचालक (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सह संचालक,नगर रचना, पुणे /कोकण/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती विभाग.
४) विभागीय आयुक्त, पुणे /कोकण/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती विभाग.
५) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड ,मुंबई.
/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रामध्ये राज्यस्तरावर प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती विभागास / संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवाव्यात.
६) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.
७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
८) निवड नस्ती (नवि-१३).

*****

# अधिसूचना

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ०५ /०९/२०१८

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम**

**क्रमांक-:** टिपीएस- १८१७/प्र.क्र.१८१/१७/नवि-१३:- ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने, वेळोवेळी विविध प्रदेशांसाठीच्या प्रादेशिक योजनांना (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम १५ अन्वये वेळोवेळीच्या अधिसूचनांद्वारे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) मंजूरी दिली असून, उक्त प्रादेशिक योजना ह्या उक्त अधिसूचनांमध्ये विहित केलेल्या दिनांकापासून अंमलात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनांच्या बाबतीत शासनाने "महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिताची प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली" (यापुढे जिचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आला आहे)क्र.टिपीएस-१८१२/१५७/प्र.क्र.७१/१२/पुर्नबांधणी क्र. ३४/१२/आर.पी./नवि-१३, दि.२१/११/२०१३ रोजीच्या अधिसूचनेखाली लागू केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनांसाठीच्या, उक्त नियमावलीमधील, शेती तथा नाविकास या वापर विभागामध्ये विनियम क्र.२२.५ (iv) (a) मध्ये काही सुधारणा करण्यासाठी फेरबदल करणे आवश्यक आहे व त्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम २० (२) मधील तरतुदींनुसार उक्त नियमावली सुधारित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले होते. (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम (३) मधील तरतूदीनुसार उक्त प्रस्तावित फेरबदल प्रस्तावाबाबत शासनाच्या नगर विकास विभागाची सूचना क्र. टिपीएस- १८१७/ प्र.क्र.१८१/१७/शिकाना/नवि-१३, दि. २४/०१/२०१८ अन्वये आम जनतेच्या सूचना / हरकती मागविण्यासाठीची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.०१/०३/२०१८ ते दि. ०७/०३/२०१८ रोजी प्रसिध्द झाली होती. प्रस्तावित फेरबदलाबाबत नोटीस प्रसिध्दीनंतर विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर संबंधितांना सुनावणी देण्याकरिता व अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनाने संबधित विभागीय सह संचालक, नगर रचना यांना प्राधिकृत केले होते. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात आलेला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिकारी यांच्या अहवालांचा विचार करुन तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या अहवालाचा विचार करुन उक्त प्रादेशिक योजनांसाठीच्या, उक्त नियमावलीमधील, शेती तथा नाविकास या वापर विभागामध्ये विनियम क्र.२२.५(iv) (a) मध्ये सोबतच्या अनुसूची मध्ये नमूद केल्यानुसार सुधारणा करण्यासाठी प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे ;

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

E:\notifications\section २० ४.docx

त्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोटकलम (४) व त्या अनुषंगाने प्राप्त अधिकारात प्रस्तावित फेरबदलास, काही सुधारणांसह सोबतच्या अनुसूची मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन अंतिम मंजूरी देत आहे.

सदरहू अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील कार्यालयात उपलब्ध राहील :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालय, तळ मजला, पुणे-४११ ००१.

२) सह संचालक, नगर रचना, पुणे /नाशिक/नागपूर/औरंगाबाद/ कोकण/अमरावती विभाग यांचे कार्यालय.

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI 32

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

"अनुसूची "

(ACCOMPANIMENT WITH GOVERNMENT NOTIFICATION, URBAN DEVELOPMENT DEPARTMENT NO. TPS- 1817/CR-181/17/UD-13, DATED - 05/09/2018)

**Sanctioned modification to the Regulation No.22.5 (iv) (a) of the Standardized Development Control and Promotion Regulations for Regional Plan areas in Maharashtra.**

<table>
<tr><th>Regulation No.</th><th>Existing Provision</th><th>Revised Provision</th></tr>
<tr><td>22.5 (iv) (a)</td><td>Minimum area of the plot shall be 4000 Sq.mt.</td><td>Minimum plot size and area of the plot shall be as given below
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Qty. of LPG in Kgs</th><th>Total area requirement for storage shed (Sq.Meter)</th><th>Safety Clearance required all around in Meters</th><th>Preferable size of land with parking area of 6M wide on front side</th></tr>
<tr><td>1</td><td>5000</td><td>55</td><td>6</td><td>21M x 26M</td></tr>
<tr><td>2</td><td>8000</td><td>88</td><td>7</td><td>25M x 30M</td></tr>
<tr><td>3</td><td>10000</td><td>110</td><td>8</td><td>28M x 33M</td></tr>
<tr><td>4</td><td>12000</td><td>132</td><td>9</td><td>31M x 36M</td></tr>
</table>
Conditions:-<br>
i) Land should be free from live overhead power transmission or telephone lines.<br>
ii) The length of the storage shed should not be more than 1.5 times of width of storage shed.<br>
iii) The land should not be situated in low lying area.<br>
iv) The land should not be situated in congested area or gaothan.</td></tr>
</table>

(R.M. Pawar)
**Under Secretary to Government**

# NOTIFICATION

**Government of Maharashtra**
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai-32
Date : **05** /09/2018.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No.TPS- 1817/CR-181/17/UD-13 :- Whereas, the Government in Urban Development Department has sanctioned the Regional Plans for various Regions (hereinafter referred to as "the said Regional Plans") under Section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide various Notifications (hereinafter referred to as "the said Notifications") from time to time which have come into force, with effect from the dates as stipulated under the said Notifications;

And whereas, the "Standardized Development Control and Promotion Regulations" (hereinafter referred to as " the said Regulations") are made applicable by the State Government to the said Regional Plans in Maharashtra State vide Notification No.TPS-1812/157/CR-71/12/Reconstruction No. 34/12/R.P./UD-13, dated 21/11/2013;

And whereas, the Government of Maharashtra was of the opinion that in the public interest, it is necessary to modify the Regulation No.22.5 (iv) (a) of the said Regulations for the said Regional Plans and accordingly to modify the said Regulations, as per the provisions of Section 20 (2) of the said Act (hereinafter referred to as " the proposed modification");

And Whereas, pursuant to the above, a Notice bearing No. TPS- 1817/CR-181/17/SHIKNA/UD-13, dated - 24/01/2018, regarding the Proposed Modification under Sub Section (3) of the Section 20 of the Said Act was published which appeared in the Maharashtra Government Official Gazette, dated 01/03/2018 to 07/03/2018 for inviting suggestions and / or objections from the general public and the concern Divisional Joint Director of Town Planning, were authorised as the "Officers" (hereinafter referred to as the " said Officers ") by the Government to hear Suggestions and / or Objections and submit their report to the State Government;

And Whereas, after considering the report submitted by the said Officers,and also considering the report submitted by the Director of Town Planning,Maharashtra State, Pune the Government is of the opinion that, it is necessary to modify the Regulation No.22.5 (iv) (a) of the said Regulations for the said Regional Plans as prescribed in Annexure attached herewith;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub-section (4) of Section 20 of the said Act, the Government hereby sanctions the Proposed Modification with certain changes as prescribed in Annexure attached herewith;

This Notification shall be kept open for inspection of the general public during office hours on all working days at the following offices :-

URBAN DEVELOPMENT DEPTT.
सत्यमेव जयते
MANTRALAYA, MUMBAI-32

1) Director of Town Planning, Maharashtra State, Central Building Ground Floor, Pune-411 001.
2) Office of the Joint Director of Town Planning, Pune/Nashik/Nagpur/Aurangabad/Konkan/Amaravati Division.

This Notification shall also be published on the Government web-site at www.maharashtra.gov.in. (कायदे व नियम)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

( R.M.Pawar )
**Under Secretary to Government**

E:\notifications\section २० ४.docx

# "Annexure "

(ACCOMPANIMENT WITH GOVERNMENT NOTIFICATION, URBAN DEVELOPMENT DEPARTMENT NO. TPS- 1817/CR-181/17/UD-13, DATED -05/09/2018)

**Sanctioned modification to the Regulation No.22.5 (iv) (a) of the Standardized Development Control and Promotion Regulations for Regional Plan areas in Maharashtra.**

<table>
<tr><th>Regulation No.</th><th>Existing Provision</th><th>Revised Provision</th></tr>
<tr><td>22.5 (iv) (a)</td><td>Minimum area of the plot shall be 4000 Sq.mt.</td><td>Minimum plot size and area of the plot shall be as given below
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Qty. of LPG in Kgs</th><th>Total area requirement for storage shed (Sq.Meter)</th><th>Safety Clearance required all around in Meters</th><th>Preferable size of land with parking area of 6M wide on front side</th></tr>
<tr><td>1</td><td>5000</td><td>55</td><td>6</td><td>21M x 26M</td></tr>
<tr><td>2</td><td>8000</td><td>88</td><td>7</td><td>25M x 30M</td></tr>
<tr><td>3</td><td>10000</td><td>110</td><td>8</td><td>28M x 33M</td></tr>
<tr><td>4</td><td>12000</td><td>132</td><td>9</td><td>31M x 36M</td></tr>
</table>
Conditions:-<br>
i) Land should be free from live overhead power transmission or telephone lines.<br>
ii) The length of the storage shed should not be more than 1.5 times of width of storage shed.<br>
iii) The land should not be situated in low lying area.<br>
iv) The land should not be situated in congested area or gaothan.</td></tr>
</table>

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(R.M. Pawar)
**Under Secretary to Government**